MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

विद्यावार्ता TM.

Special Issue-02, September 2019

Indian council of social science research

Impress

Impactful Policy Research in Social Science

Government of India
Ministry of Human Resource Development

One Day Interdisciplinary National Level Seminar

on

# SELF HELP GROUPS AND SOCIO-ECONOMIC EMPOWERMENT OF WOMEN

Friday, 27th September, 2019

**Organized By**

Department of Economics

Shri Balaji Sansthan, Deulgaon Raja's

**SHRI VYANKATESH ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE**

Deulgaon Raja, Dist.Buldhana- 443 204.

NAAC Re-accredited at 'B' Level

Editor

**Dr. Dnyaneshwar Gore**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

24) ग्रामिण महिला उद्योजकता विकासात वाशिम जिल्ह्यातील महिला बचत गटांची भूमीका
प्रा. डॉ. विनोद रतिराम बन्सिले, देऊळगांवराजा. ||100

25) ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण आणि स्वयंसहाय्यता बचतगट चळवळ
डॉ. भालेराव जे. के., बीड ||104

26) लातूर जिल्ह्यतील महिलांच्या विकासात बचत गटाची भूमिका
पाटील सुलक्षणा भारत, नांदेड ||107

27) स्वयं—सहाय्यता गट, पर्यटन आणि महिलांचे समाजार्थिक सबालीकरण
डॉ. जगन्नाथ नारायण ढाकणे, लोणार ||109

28) स्वयंसहाय्यता बचत गट व महिलांचे सबलीकरण
प्रा.डॉ. व्हि. बी. पवार, अकोला ||112

29) महिला सक्षमीकरणात स्वयंसहाय्यता गटाची भूमिका
प्रा. डॉ. अनिल खु. ठाकरे, अकोला ||114

30) महिला बचतगट काळाची गरज
प्रा.डॉ. भिमराव प्र. उबाळे, बुलडाणा ||116

31) स्त्री सबलीकरण : सामाजिक, आर्थिक दृष्टिकोणातुन मुल्यमापण
डॉ. प्रा. पी. डी. हुडेकर, बुलडाणा ||120

32) स्वयंसहाय्यता बचत गट : महिलांना उद्योजक होण्याची संधी
प्रा.डॉ. मदन शेळके, लातूर ||124

33) महिलांच्या आर्थिक व सामाजिक विकासात स्वयंसाहाय्य गटांची भूमिका आणि महत्त्व
डॉ. मधुकर पिराजी शेळके, जालना. ||12

34) महिला बचतगट आणि महिलांचे सबलीकरण
प्रा.कु. स्वाती रामदास शिंगणे, बुलडाणा ||1

35) स्व सहाय्यता गट व महिला सबलीकरण
प्रा. डॉ. फड कालिदास दिनकर, औरंगाबाद |

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

३. शैक्षणिक प्रगतीला चालना मिळाली.

४. समाजिक व राजकीय सहभागात सामील होण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे.

५. बचत गटाच्या माध्यमातून कौटुंबिक समस्येचे निराकरण करणे शक्य झाले आहे.

६. महिलांच्या व्यक्तीमत्व विकासात भर पडली आहे.

७. कुटुंबात व समाजात प्रतिष्ठा वाढीस लागली आहे.

**उपाययोजना :—**

१. बचत गटांना वित्त पुरवठा वेळेत करणे.

२. शासकीय स्तरावर महिला उद्योग प्रशिक्षण केंद्रे स्थापन करावीत.

३. उद्योगानुसार व गरजेनुसार त्यांना वित्त सहाय्य करणे.

४. स्त्रियांमध्ये जागरुकतेसाठी नविन नविन योजना राबविण्यात याव्यात.

**संदर्भ सूची :—**

१. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मुंबई

२. स्वर्ण ग्राम जयंती स्वयरोजगार योजना, महाराष्ट्र शासन, मुंबई २००५.

३. काटोले रविंद्र म. महिला बचत गट, २००६

४. योजना मासिक

❑❑❑

30

# महिला बचतगट काळाची गरज

**प्रा.डॉ. भिमराव प्र. उबाळे**
समाजशास्त्र विभाग, संत भगवान बाबा कला, महाविद्यालय सिंदखेड राजा, जि.बुलडाणा

*************

महाराष्ट्र शासनाने १९९४ मध्ये महिलांसाठी व त्यांच्या सक्षमिकरणासाठी महिला धोरण जाहिर केले आहे. त्यातील एका उपक्रमाचे नाव आहे, स्वयंसहाय्यता बचत गट. संघटीत महिलांची शक्ती व आत्मविश्वास वाढविण्यासाठी परस्परांच्या सहकायनि तयार झालेल्या गटाला स्वयंसहाय्यता गट किंवा बचत गट म्हटले tks baz h ; k xVky k Shelf help Group असे म्हटले जाते. आपण स्वत: बचत करावी व त्या बचतीव्दारे कर्ज घेवून उद्योग व्यवसाय उभारुन स्वावलंबी व्हावे हा बचत गटाच्या स्थापने मागील महत्त्वपूर्ण उद्देश आहे. बचतीतून एकजुट, एकजुटीतून शक्ती, आणि शक्तीतून युक्तीचा म्हणजे स्वत:मधील अंगभुत गुणांचा झालेला साक्षात्कार व या साक्षात्कारातून स्वयंपूर्णतेचा शोध घेवून स्वबळावर हिम्मतीने उभे राहण्याची मिळालेली ताकद असे हे स्त्री शक्तीचे प्रत्यंत्तर महिला बचत गटाच्या चळवळीने घडविलेले आहे. मुख्य म्हणजे हे बचतीच्या महान मंत्राने घडविलेले आहे.

समाजाने केलेल्या सुयोग्य व परिणामकारक बचतीच्या माध्यमातून स्वत:च्या विकासासाठी सुयोग्य व नियोजनबध्द पध्दतीने उद्योग केल्यास गतिशिल विकास शक्य आहे. छोटया बचतीतून महान किंवा मोठी बचत होत असते. अशी एकत्रित बचत विकासाच्या समान कारणांसाठी एकत्र येणाऱ्या महिल आपला बचतगट चालवून परस्परांच्या विश्वासाने सहकायनि करु शकतात. बचतगटाच्या उपक्रमा महिलांना बचत करण्याची व त्या बचतीचा य वापर करण्याची, त्याचप्रमाणे आर्थिक नियोज

हिशोब करण्याची क्षमता प्राप्त होत आहे. महाराष्ट्राला समुह उद्योजकता ही संकल्पना काही नविन नाही. सहकाराच्या माध्यमातून राष्ट्राच्या विकासात समुह उद्योजकतेचे मोठे योगदान आहे. महिला बचत गटांच्या माध्यमातून हा समुह उद्योजकतेचा अविष्कार नव्या रुपाने ग्रामीण आर्थिक विकासाचा चेहरा मोहरा बदलु शकेल म्हणूनच महिला बचतगट ही काळाची व राष्ट्राची आज गरज आहे.

बचतगट हा एक सामाजिक व आर्थिक उपक्रम आहे. ही प्रक्रिया संघटीतपणे एकमेकांना समजून घेत होत असल्याने या रचनेला स्वयंसहाय्य गट असे संबोधले जाते. स्वयंसहाय्यता गट म्हणजे लोकांनी लोकांसाठी लोकांकरीता चालविलेले किंवा हाती घेतलेले कार्य असा अर्थ अधोरेखित केला जातो. स्त्रीया एकत्र घेवून व्यवसाय करत असल्यामुळे व हि पारदर्शक सहकाराची प्रक्रिया असल्यामुळे स्त्रीयामध्ये मोठ्या प्रमाणात उद्योजकता निर्माण झाली आहे. अनेक प्रकारचे उद्योग बचतगट चळवळीतून निर्माण झाले आहेत. ग्रामीण आणि शहरी या दोन्ही भागात बचत गटाचे कार्य आज मोठ्या प्रमाणात सुरु असलेले दिसून येते.

महिलांचा समाजिक आणि आर्थिक स्तर उंचावण्यासाठी बचत गट हा उपक्रम सरकारकडून चालविला जातो. आज महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात, जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात अशा प्रकारचे असंख्य बचत गट तयार झाले आहेत. या गटात स्त्री पुरुष असा भेदभाव नाही. या गटात कमीत कमी दोन व जास्तीत जास्त २० सदस्य, या प्रमाणे गट तयार केले जातात. प्रत्येक गटातील प्रत्येक सदस्य ठरलेल्या कालावधीमध्ये बचत म्हणुन ठराविक रक्कम जमा करत असतो. हा कालावधी आठवड्यातून किंवा महिण्यातून एकदा असतो. हि जमा झालेली रक्कम बचतगटातील सदस्यांना कर्ज म्हणून दिली जाते. सभासदाने हप्त्या—हप्त्याने कर्ज परत करणे बंधनकारक असते. महाराष्ट्र राज्यातील गरीब कुटुबांना शाश्वत उपजिविकेच्या माध्यमातून गरीबीतून बाहेर काढण्यासाठी अनेक प्रयत्न करण्यात येत आहेत. या अभियानामधील सामाजिक समावेशन आर्थिक समावेशन, वित्तीय समावेशन, सार्वजनिक सेवांची उपलब्धी व विकास योजनांचा लाभ हे या अभियानाचे आधारस्तंभ आहेत.

बचत गटांच्या माध्यमातून महिलांनी सुरु केलेले विविध उदयोग, व्यवसाय व त्यामधून घेतलेली आर्थिक भरारी :

**१. खादयान्न प्रक्रियेतील उद्योग :**

भारताच्या वार्षिक एकुन उत्पादन मुल्यांच्या ३६% भाग अन्नप्रक्रिया उद्योगात व्यापतो. आणि एकुन रोजगाराच्या ६०% रोजगार हा अन्नप्रक्रिया उद्योग उपलब्ध करुन देतो. एकुन अन्नपदार्थाची बाजारपेठ ४ लक्ष ५० कोटी रुपयांची आहे. नविन कृषी योजना या दृष्टीने समृध्द ठरते. फळे, भाजीपाला, फुले, मशरुम, शितपेय, मद्य व मद्यार्क, दुध व दुग्धजन्य पदार्थ, स्नॅक्स, फ्रुटस तयार करणारे पदार्थ, फरसाण, मिठाई, मासे, अंडी यांचे पदार्थ इ. महत्त्वपूर्ण खादयान्न उद्योग सातत्याने प्रगती पथावर आहेत. अशा खादयान्न प्रक्रिया उदयोगातील विविध संधी व त्यातील महत्त्वाच्या बाबी उद्योग उभारणीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत.

**अ. अन्नधान्यावर आधारीत प्रक्रीया उद्योग :**

तयार पॅक पिठ किंवा आटा प्रक्रिया, पोहे, मुरमुरे, बेकरी उत्पादनाचे ब्रेड, बिस्कीटे, केक, शेवया नुडल्स इ. पदार्थ्यांची मागणी सतत वाढत असल्याने अनेक बचत गटांनी हे उद्योग सुरु केलेले आहेत.

**ब. खाद्यतेल तयार करणे :**

खाद्यतेल हे आपल्या रोजच्या स्वयंपाकगृहातील अत्यंत आवश्यक पदार्थ आहे. महाराष्ट्रात विविध तेल बियांचे उत्पादन मोठया प्रमाणात आहे. शेंगदाणा, करडी, सुर्यफुल, सरकी, सोयाबिन, तीळ, एरंडी, जवस इ. तेलबियावर प्रक्रिया करुन तेल निर्मिती उद्योग बरेच बचतगट करत आहेत.

**क. रेडीमेड अन्नपदार्थ प्रक्रिया उद्योग :**

खमंग चटकदार पदार्थांना व पारंपारीक उद्योगाला सध्या मोठया प्रमाणात बाजारात वाव आहे. पापडाचे प्रकार, मसाले, मसाला पेस्ट, चटण्या, लसून, अद्रक पेस्ट तयार करणे, बटाटा चिप्स, चिवडा, तयार इटली ढोकळा पिठ, मिक्स तयार गुलाब जाम, चकली, बाकरवडी चॉकलेट, सुगंधी द्रव्य, खादयरंग, पानात घालण्यासाठी लागणारे पदार्थ, गुलकंद, गुलाबपाणी,

सोडावाटर, शरबती पावडर असे लहान मोठे उद्योग बचतगटाच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

**ड. दुग्ध प्रक्रिया उद्योग :**

दुध आणि दुग्धजन्य पदार्थाची मागणी महाराष्ट्रात गेल्या दशकापासून खुपच वाढली असून दूधापासून पारंपारीक पदार्थाप्रमाणे खवा मेवा, मिठाई, सुवासिक दुध, पेय, पनिर, चिज इ. पदार्थ व आईसक्रिम उद्योग बचत गटापासून सुरु झाले आहेत. तसेच काही बचतगट अशा प्रकारचे उद्योग सुरु करु शकतात.

**२. चटकदार मसाले तयार करणे :**

भारतातील लक्षावधी घरामध्ये व हॉस्टेलमध्ये हमखास मसाले वापरले जातात. मसाले उद्योग हा सर्वात महत्त्वाचा उद्योग म्हणून ओळखला जाणारा आणी महिलांसाठी उपयुक्त व एक यशस्वी उद्योग ठरु शकतो. या उदयोगात दर्जेदार नैसर्गिक मसाले साहित्यावर प्रक्रिया करुन तयार केलेले विविध मसाले उत्पादनांना सर्व स्तरावर सातत्याने मागणी आहे.

**३. नाविन्यपूर्ण चटण्या व लोणची उद्योग :**

सध्या अगदी लहान मुलांपासून तर मोठया व म्हाताऱ्या व्यक्तींना चटण्या व लोणची खुप आवडतात. जेवणात त्यांचे महत्त्व खुप आहे. अशा चटण्या व लोणची विविध प्रकारात तयार करता येतात. कऱ्हाळ, जवस, शेंगदाणे, खोबरे, अमसुल, खजुर, डाळीची चटणी व पुदीना, कांदा, कैरी चटनी अशा दर्जेदार, स्वादिष्टमय, चटकदार चटण्यांना तसेच मजेदार, लज्जतदार कैरी, लिंबू, फणस, हिरव्या मिरच्या, गाजर, कॉलीफ्लॉवर व ड्रायफ्रुट लोणच्यांना सर्वत्र मोठया प्रमाणात घरोघरी व बाजारात सर्वत्र मागणी आहे.

**४. पापड, शेवया व वेफर्स तयार करणे :**

जे लोक खादय पदार्थाच्या वस्तु किंवा पदार्थ तयार करतात त्यांचा धंदा कधीही तोटयात जात नाही. पापड, शेवया, वेफर्स व खमंग चटकदार पदार्थांना बाजारात मोठया प्रमाणात मागणी आहे. या वस्तु पाहिजे तेव्हा स्वच्छ व ताज्या स्वरुपात मिळतात. पापड, शेवया व वेफर्स हे पदार्थ सर्वत्र लोकप्रिय खादयपदार्थ झालेले आहेत. स्वाद, चव व पॅकींग इ. बाबतीत चांगली गुणवत्ता ठेवल्यास सातत्याने प्रचंड मागणी वाढू शकते व हा उद्योग भरभराटीस येवू शकतो.

**५. चिवडा, चकली, बाकरवडी व फरसाण उद्योग:**

भारतीय नाष्ट्याचे व खाण्याचे पदार्थ आता जगभर खुप लोकप्रिय होत आहेत. कुरकुरीत चकली व स्वादिष्ट बाकरवडी, खमंग चिवडा, फरसाण खायला सर्वांनाच आवडते. अशी स्वादीष्ट व खमंग उत्पादने तयार करुन ती आपल्या ब्रॅडनेम च्या पॅकींगसह बाजारात विक्रीसाठी पाठविता येतात. अशा उदयोगांना समाजात मोठया प्रमाणात वाव आहे. असे उद्योग अतीशय अल्प भांडवलात व कमी गुंतवणुकीत सहज तयार करता येतात.

**६. नाचणीचे सत्त्व तयार करणे :**

नाचणीचे सत्त्व हे परंपरेने एक पौष्टीक खादय मानले जाते. आरोग्याला अत्यंत उपयुक्त असे खादय आहे. नाचणीत कॅल्शीयम, लोह, प्रोटीन, व्हिटॅमिन, कार्बोहायट्रेटस् आणि आस्थि व स्नायु मजबुत करण्यासाठी लागणारी खनिजे शरीराला मिळत असल्याने मुलांसाठी ते उत्तम पुरक व सर्वोत्तम अन्न आहे. वयस्कर व्यक्तींनाही ताकद, उत्साह व जोम देवून ते तंदुरुस्त राहण्यास मदत करते.

**७. बेकरी उद्योग :**

बेकरीमध्ये पाव, बिस्कीटे, खारी, टोस्ट, केक इ. असंख्य पदार्थ तयार केले जात असले तरी आजच्या युगात सर्वाधिक महत्त्व पाव व ब्रेडला आहे. पाव व ब्रेडची मागणी जास्त असल्याने त्याचा तुटवडा पडतो. त्यामुळे पाव व ब्रेड उद्योग मोठया प्रमाणात आज वाढत आहेत.

**८. बिस्कीट उद्योग :**

चंगली बिस्कीटे रुचकर कुरकुरीत आणि आरोग्य वर्धक असली पाहीजेत. उत्तम प्रतीची बिस्कीटे कमीत कमी सहा महिण्यापर्यंत टिकतात. या बिस्कीटांना समाजामध्ये खुप मोठया प्रमाणावर मागणी असल्यामुळे हा उद्योग देखिल बचत गटा कडून केला जातो.

**९. पॉपकॉर्न, राजगिरा वडी व खारे शेंगदाणे तयार करणे :**

**अ. लाह्या / पॉपकॉर्न** हा पदार्थ लहानापासून ते मोठ्या माणसापर्यंत सर्वांनाच आवडतो. बस व रेल्वे प्रवासात, बाजारपेठ, सिनेमागृह, आनंद मेळा किंवा बागेत सहज फिरता फिरता मुले व मोठी

माणसे लाह्या/पॉपकॉर्न खातांना दिसतात. हा पदार्थ मक्यापासून बनविला जातो. हा पदार्थ तयार करण्यासाठी खास तांत्रिक कौशल्याची गरज पडत नसून सहज सोपा व कमी भांडवलात सुरु होणारा हा व्यवसाय/उद्योग आहे.

**ब. राजगिरा वडी तयार करणे :**

राजगिऱ्याच्या वडया हा अत्यंत लोकप्रिय खाद्य पदार्थ आहे. थोरा मोठ्यांना, लहान बालकांना राजगिरा वडी खुप आवडते. उपवासाच्या दिवशी या पदार्थास खुप मागणी असते.

**क. खारे शेंगदाणे तयार करणे :**

खारे शेंगदाणे हा एक शहरी व ग्रामीण युवक युवतींना व आबाल वृध्दांना आवडणारा पदार्थ आहे. शेंगदाण्यात प्रथीने व स्निग्ध पदार्थ भरपुर प्रमाणात असतात. शेंगदाण्याचे अनेक चवदार प्रकार बनविले जातात. कमी भांडवलात सहज सोपा व बाजारपेठेत लोकप्रिय असलेला हा उद्योग आहे.

**१०. वह्या, ऑफिस फाईल व कागदी पाकिटे तयार करणे :**

शाळा, कॉलेज, क्लासेस व ऑफिसमध्ये विद्यार्थ्यांपासून तर कर्मचाऱ्या पर्यंत सर्वांनाच वह्या व रजिष्टर मोठ्या प्रमाणात व सातत्याने लागतात. दरवर्शी वह्यांची मागणी वाढत असते. वह्यांच्या जोडीला शालेय मागणी नुसार उत्तरपत्रिका तयार करुन देणे, रायटींग पॅड तयार करणे, सर्व प्रकारची कागदी पाकिटे, ऑफिस फाईल्स, बॉक्स फाईल्स इ. उत्पादनांना वर्षभर बाजारपेठेत चांगली मागणी असते. नफा देणारा हा उद्योग आहे.

**११. सुगंधी अगरबत्ती, द्रव्ये व धुपकांड्या तयार करणे :**

माणुस कोणत्याही जाती, धर्म व पंचाचा असो तो सकाळी पुजा करतांना, दुकान उघडल्यावर, कामाची सुरुवात करतांना, कोणत्याही शुभ प्रसंगी सुगंधी मनमोहक अगरबत्ती, धुपबत्ती, मेनबत्ती लावतात. दररोज मोठ्या प्रमाणात खप असणाऱ्या या मालाचे उत्पादन छोट्या प्रमाणावर ही सुरु करता येते. या उद्योगाचे तंत्रज्ञान देखिल सोपे आहे.

**१२. मेनबत्ती व कापुर वडी तयार करणे :**

मेनबत्ती चा वापर खेड्यापाड्यात, धार्मिक स्थळी, चर्चमधून पार्थनेच्या वेळी, दिवाळी, नाताळ, वाढदिवस व अनेक शुभ प्रसंगी केला जातो. विंदयुत पुरठा खंडीत झाल्यास प्रकाशासाठी अनेक लोक मेनबत्ती वापरतात. हा देखिल कमी खर्चात व कमी भांडवलात सुरु होणारा उद्योग आहे.

**१३. वाशिंग सोप, डिटर्जंट पावडर व निळ तयार करणे :**

कपड्यांच्या धुलाईसाठी प्रामुख्याने सोप, पावडर व निळ दैनंदिन खुप मोठ्या प्रमाणात वापरली जाते. घरगुती व लॉन्ड्रीमध्ये या उत्पादनांना मोठी मागणी आहे.

**१४. पिको फॉल सेंटर व एब्रॉयडरी सेंटर :**

स्त्रीयांना पिको फॉल व एब्रॉयडरीचे काम करण्यास आवडते. पिको फॉल व एब्रॉयडरी हा व्यवसाय आज शहर व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात मागणी असलेला व्यवसाय आहे.

**१५. हॉटेल, रेस्टॉरंट व ज्युस बार :**

आज जिवनशैलीत आमुलाग्र बदल होत असून राहणीमान व खाण्याच्या सवयी बदलत आहेत. चमचमीत पदार्थ व चवीष्ट जेवनाकडे लोकांचा कल वाढत आहे. प्रचंड नफा देणारा हा व्यवसाय असून सुरु करणे सोपे आहे. पण या व्यवसायात तुमचे कौशल्य, नविन्यता व दर्जा अत्यंत महत्त्वाचा आहे.

**१६. खानावळ व भाजी पोळी केंद्र :**

पोळी भाजी केंद्र चालविने, जेवणाचे डब्बे पुरविणे व खानावळ चालविणे हा नविन व्यवसाय आज मोठ्या प्रमाणात चालत आहे. हा व्यवसाय महिलांसाठी सर्वोत्तम व उत्कृष्टरित्या चालविला जाणारा व्यवसाय आहे. भाजी पोळी व खानावळीचा व्यवसाय हा मुख्यत्वे रेल्वे स्टेशन, बसस्थानक, कॉलेज, कारखाने व बाजारपेठेच्या जवळपास चांगल्या प्रकारे चालु शकतो.

**१७. ब्युटीपार्लर :**

सौंदर्य हा स्त्रीयांचा दागणा समजला जातो. आपले सौंदर्य अधिकाधिक खुलविण्यासाठी सौंदर्यउपासणा करणे हे अगदी पुरातन काळापासून चालत आले आहे. पायाच्या नखापासून तर डोक्याच्या केसापर्यंत विविध प्रकारांनी सौंदर्य वर्धन केले जाते. पूर्वी घरीच नैसर्गिक गोष्टींचा वापर करुन चेहरा व शरीराची निगा राखली जायची. काळानुसार सौंदर्य

उपासना घराबाहेर पडून करावी लागत आहे. या सौंदर्य उपासनेच्या ठिकाणालाच ब्युटी पार्लर असे नाव दिले गेले.

केवळ फेशियल, ब्लिचिंग, आयब्रो, मॅनिक्युअर, पॅडीक्युअर वर ब्युटी पार्लरची प्रगती थांबली नाही तर विविध आधुनिक उपकरणांचा वापर आता ब्युटी पार्लर्समध्ये होवू लागला आहे.

**बचतगटासाठी कृषी पुरक उद्योग संधी :**

१. आधुनिक गोपालन.
२. आधुनिक म्हैस पालन.
३. आधुनिक शेळीपालन.
४. आधुनिक कुकुटपालन.
५. दुग्धजन्य पदार्थ निर्मीती.
६. फळ प्रक्रिया उद्योग.
७. जैम व जैली तयार करणे.
८. टोमॅटो सॉस तयार करणे.
९. काजू प्रक्रिया उद्योग.
१०. बेदाने (मणुका) निर्मिती.
११. डाळ मिल.
१२. ऑईल मिल.
१३. रेशिम उद्योग.
१४. गांडुळखत निर्मिती.
१५. नर्सरी व फुलशेती.
१६. छोटे किराणा दुकान चालविणे.
१७. भाजीपाला विक्री केंद्र.
१८. पिठाची चक्की चालविणे.
१९. शिलाई मशिन चालविणे.

या सारखे अनेक उद्योग आज बचत गटांच्या माध्यमातून चालविले जात आहेत. सर्वच उद्योग अगदी मोठ्या प्रमाणात सुरु झालेले नसले तरी अनेक महिलांना व पुरुषांना या उद्योगातून रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. अनेकांना आर्थिक स्थैर्य लाभले आहे. त्यामुळे अनेक कुटुंबाचा सामाजिक व आर्थिक स्थर बदलला आहे. या बचत गटांनी एक नवा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. या माध्यमातून कासवगीतने का होईना परंतु समाज विकास करीत आहे. प्रगीत साधत आहे. हे मात्र मान्य करावेच लागेल.

**करुनी बचत गटाची निर्मिती।**
**घडवू देशाची प्रगती।।**

□□□

**31**

# स्त्री सबलीकरण : सामाजिक, आर्थिक दृष्टिकोणातुन मुल्यमापण

**डॉ. प्रा. पी. डी. हुडेकर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
(कला व वाणिज्य) विदर्भ महाविद्यालय, बुलडाणा

***********

**प्रस्तावना**

स्त्रीवर्गाची देदीप्यमान वाटचाल हा स्वातंत्र्यानंतर भारताला लाभलेला लक्षणीय बदल म्हणावा लागेल. स्वातंत्र्यापूर्वी असणारी स्त्री जिला शिक्षणासारख्या मुलभूत अधिकारापासून वंचित राहावे लागले ते आजच्या स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षित व विविध उच्चस्थ पदावर काम करणाऱ्या स्त्रियांचा प्रवास अतिशय विलक्षण असलेला जाणवतो.

आज वेगवेगळ्या क्षेत्रात आत्मविश्वासाने, जिद्दीने कार्य करणाऱ्या स्त्रीया बघितल्या की स्त्रीप्रश्न संपलेत कां? असा प्रश्न निर्माण होतो. मात्र वस्तुस्थिती पुन्हा स्त्री प्रश्नाकडे आकर्षित व्हायला भाग पाडते. वर्तमानपत्रात दैनंदिन येणाऱ्या स्त्रीप्रश्नाविषयी बातम्या वाचून घरात, समाजात महिलांचा होणारा नैतिक छळ, शारीरिक सुरक्षिततेची भीती या सर्व बाबीमुळे स्त्रीप्रगतीचे, महिलांच्या सवयंपूर्णतेचे चित्र एक सत्य नसून भास वाटू लागतो. एका बाजूने महिला सबलीकरणाच्या नावाखाली शाशन, समाज व विविध महिला संघटनांद्वारे होणारे प्रयत्न व त्या प्रयत्नांची फलश्रुती यांचे मापन केले तर काय खरे व काय खोटे हे सांगणेही कठीण होऊन जाते. स्त्रियांचे सामाजिक, राजकीय, आर्थिक सबलीकरण या विषयाची थोड्या प्रमाणात उकल करण्याचा प्रयत्न संबंधित संशोधन लेखात केला.

'ज्या समाजात स्त्रियांना समता व सन्मान वागवले जाते तोच समाज सर्वार्थाने आपला उ[illegible] करून घेऊ शकतो' हे तत्वचिंतनातील सार [illegible]